# Pimpri Chinchwad Police Commissionerate

**प्रेसनोट**

जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/२६१४/२०१९/पिंपरी-चिंचवड,   दिनांक - २६/१२/२०१९

दि.०१/०१/२०२० रोजी विजयरणस्तंभ पेरणेफाटा येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. सदर कार्यक्रमाकरीता महाराष्ट्रातुन व बाहेरील राज्यातुन मोठया प्रमाणात लोक येत असतात. सदर ठिकाणी अंदाजे १० ते १२ लाख जनसमुदाय जमण्याची शक्यता आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करुन मी सुधीर हिरेमठ पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

तरी नागरीकांनी खालील पर्यायी मार्गाचा वापर करावा. अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून तार्त्पुत्या स्वरुपात आदेश काढण्यात येत आहे.

**<u>दिघी-आळंदी, चाकण, देहुरोड- तळेगाव वाहतुक विभाग अंतर्गत</u>**

१. चाकण / पिंपरी चिंचवडकडुन आळंदी मार्गे नगर बाजुकडे जाणारी परिवहन महामंडळाच्या बसेस, जड वाहने /माल वाहतुक (ट्रक/टेम्पो) ही मरकळ पासुन पुढे लोणीकंदकडे न जाता कोयाळी- शेलपिंपळगाव मार्गे चाकण- शिक्रापुर रोडने शिक्रापुरकडे व सोलापुर बाजुकडे जाणारी जड वाहने ही आळंदी-चहोली फाटा येथुन दिघी मार्गे विश्रांतवाडी, येरवडा, खराडीबायपास हडपसरमार्गे इच्छित स्थळी जातील.

२.शिक्रापुर कडुन येणारी मोठी वाहने हि तळेगाव चाकण चौक येथुन इच्छीत स्थळी जातील.

३.नाशिककडुन येणारी मोठी वाहने हि शिक्रापुरकडे न जाता तळेगाव चाकण चौकातुन इच्छीत स्थळी जातील.

४. देहुरोड येथे मुंबई जुन्या हायवेने येणारी वाहतुक सेंट्रल चौकातुन निगडी पिंपरी-चिंचवडकडे न सोडता सदरची वाहतुक सेंट्रल चौकाकडुन कात्रज रोडने सरळ वाकडनाका, राधा चौकातुन इच्छित स्थळी जातील.

५.मुंबईकडुन पुणेकडे जाणारी सर्व प्रकारची हलकी वाहने यांना वडगाव फाटा, सोमाटणे फाटा, सेंट्रल चौक कात्रज रोडने सरळ वाकडनाका व राधा चौक येथुन इच्छीत स्थळी जातील.

६.मुंबईकडुन एक्स्प्रेस हायवेने पुणेकडे येणारी वाहने उर्से टोल नाका येथुन कात्रज रोडने (निगडी मुकाई चौकाकडे न जाता) सरळ वाकडनाका व राधा चौक येथुन इच्छित स्थळी जातील.

७.मुंबई कडुन एक्सप्रेस हायवेने खिंडीतुन तळेगावकडे जाणारी वाहतूक वडगाव फाट्याकडे न जाता उर्सेटोल नाका येथुन सोमाटणेकडे जाणारे बाह्यवळण रोडने इच्छित स्थळी जातील.

८.नाशिक व तळेगावकडुन येणारी वाहतूक हि तळेगाव चाकण चौकातुन शिक्रापुर कडे न जाता आळंदी फाटा येथुन आळंदी मार्गे इच्छीत स्थळी जातील.

वरील प्रमाणे दिघी-आळंदी, देहुरोड-तळेगाव व चाकण वाहतुक विभाग अंतर्गत येणा-या व जाणा-या परिवहन महामंडळाच्या बसेस, जड वाहने /माल वाहतुक टेम्पो/ट्रक वाहनांकरीता वरील मार्गावर दि.३१/१२/२०१९ रोजी रात्री २३.०० वा पासुन ते दि.०१/०१/२०२० रोजी रात्री २४.०० वा. पर्यत वाहतुक वळविणेबाबत अधिसुचना (नोटीफिकेशन ) काढण्यात येत आहे.

Shiremath

(सुधीर हिरेमठ) भा.पो.से
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा
पिंपरी चिंचवड.

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.
प्रत :१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) प्रभारी अधिकारी <u>दिघी आळंदी, देहुरोड- तळेगाव</u>, चाकण वाहतुक विभाग
४) कार्यकारी अधिकारी, नगरपरिषद, देहुरोड, चाकण, आळंदी
/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.